वरिष्ठ भूवैज्ञानिक व सहायक भूवैज्ञानिक संवर्गाच्या दिनांक ०१.०१.२०२३ च्या अंतरिम ज्येष्ठतासूच्या प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: ज्येष्ठता-२०२३/प्र.क्र.४७/२०२३/आ (वर्ग-२)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१० जुलै, २०२३

वाचा:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/कार्या-१२, दिनांक १३.०७.२०२१.

२) जलसंपदा विभाग,शासन परिपत्रक क्रमांक,ज्येष्ठता-२०१७/प्र.क्र.९२/२०१७/आ(वर्ग-२), दिनांक ०२.०५.२०१७.

३) समक्रमांकाचे शासन परिपत्रक, दिनांक **२९.०५.२०२३**

-: परिपत्रक :-

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार जलसंपदा विभागातील वरिष्ठ भूवैज्ञानिक व सहायक भूवैज्ञानिक या संवर्गाच्या दिनांक ०१.०१.२०२३ च्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर ज्येष्ठतासूच्यांमध्ये काही आक्षेप असल्यास, त्याबाबत हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहीत मार्गाने शासनाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तथापि, प्रसिध्द करण्यात आलेल्या उक्त तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्यांबाबत कोणत्याही प्रकारचे आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

२. त्यानुषंगाने आता विभागातील वरिष्ठ भूवैज्ञानिक व सहायक भूवैज्ञानिक या संवर्गाच्या दिनांक ०१.०१.२०२३ च्या अंतरिम ज्येष्ठतासूच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या अनुक्रमे परिशिष्ट- अ व ब अन्वये प्रसिध्द करण्यात येत आहेत.

३. सदरहू अंतरिम ज्येष्ठतासूच्या तयार करताना मुख्यत्वेकरून महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतूदींचा अवलंब करण्यात आला आहे.

४. सदर अंतरिम ज्येष्ठतासूच्या या मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल व प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहेत.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०७१०१५२८०५२७२७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

BAPUSAHEB R SONAWANE

Digitally signed by BAPUSAHEB R SONAWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=aa9f65e90f34e5648365a67ac974407846b2378509021d9a9b764788f91300c2,
pseudonym=97A776F6F30F8466194234A275563339B9998934,
serialNumber=8D6647630D541B9030FF94EF31AFD6FA8B275E0E15A69D5F68163604468DC5D6, cn=BAPUSAHEB R SONAWANE
Date: 2023.07.10 15:31:57 +05'30'

(बा.रा.सोनवणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- परिशिष्ट-अ व ब

प्रत-

१. अपर मुख्य सचिव , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
२. सचिव (लाक्षेवि)/सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे)
४. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
५. सह सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (प्रशासन), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मुख्य अभियंते तथा सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक
९. अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे
१०. कार्यासने:- आ(वर्ग-१)/आ(संनि)/गोपनीय शाखा, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आ(वर्ग-२) कार्यासन संग्रहार्थ.

<u>परिशिष्ट-अ</u>

वरिष्ठ भूवैज्ञानिक,गट-अ संवर्गाची दिनांक ०१.०१.२०२३ ची अंतरिम ज्येष्ठतासूची

वेतनश्रेणी : S-२० : ५६१००-१७७५००

ज्येष्ठता क्रमांक	शासकीय कर्मचाऱ्याचे नांव	नियुक्तीचा मार्ग	जन्मदिनांक	प्रवर्ग	पदोन्नती / नियुकती आदेशाचा दिनांक	ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शैक्षणिक अर्हता	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	श्री. सुनिल रामचंद्र जाधव	पदोन्नती	२२-०६-१९६४	अ.जा.	२५-०५-२०१५	२५-०५-२०१५	३०-०६-२०२२	एम.एस.सी. (भूशास्त्र)	सेवानिवृत्त
२	श्री. सुधीर रामराव साले	पदोन्नती	०१-०२-१९६५	खुला	०८-०३-२०२२	०८-०३-२०२२	३१-०१-२०२३	बी.एस.सी. (भूशास्त्र)	

<u>परिशिष्ट-ब</u>

सहायक भूवैज्ञानिक, गट-ब संवर्गाची दिनांक ०१.०१.२०२३ ची अंतरिम ज्येष्ठतासूची

वेतनश्रेणी : S-१५ : ४१८००-१३२३००

ज्येष्ठता क्रमांक	अधिकाऱ्यांचे नांव	नियुक्तीचा मार्ग	जन्मदिनांक	जात प्रवर्ग	पदोन्नती / नियुकती आदेशाचा दिनांक	ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शैक्षणिक अर्हता	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	श्री. सुधीर रामराव साले	पदोन्नती	०१-०२-१९६५	खुला	१०-०४-२०१२	१०-०४-२०१२	३१-०१-२०२३	बी.एस.सी. (भूशास्त्र)	वरिष्ठ भूवैज्ञानिक पदावर पदोन्नत